माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : २२/२०२३**

**तक्रारकर्ता, श्री. रामलाल नत्थुजी श्रावणकर,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी, तथा अधिक्षक वर्ग -२, शिक्षण विभाग (माध्य),**
जिल्हा परिषद भंडारा, ता. जि. भंडारा

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,**
भंडारा ता. जि. भंडारा

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २२.११.२०२३**

**तक्रारकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| १९.०४.२०२२ | --- | १६.०१.२०२३ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. ८००/२०२० मध्ये दिनांक १९.०४.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २२.११.२०२३ रोजी ऑनलाईन सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, वर्ग-२ शिक्षण विभाग (माध्य), जिल्हा परिषद, भंडारा, ता. जि. भंडारा, ऑनलाईन उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद भंडारा, ता. जि. भंडारा, ऑनलाईन उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. ८००/२०२० मध्ये दिनांक १९.०४.२०२२ रोजी सुनावणी घेवून " या प्रकरणात दिनांक १३.०७.२०१५ रोजी सादर केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद भंडारा यांचेकडे उपलबध असलेल्या संपूर्ण नस्तीची प्रत अपिलार्थीस सदर आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामुल्य प्रदान करण्यात यावी. तसेच नुतन महाराष्ट्र विद्या विकास मंडळ भंडारा व्दारा संचालित बंसीलाल लाहोटी नुतन महाराष्ट्र विद्यालय भंडारा ही शाळा अनुदानित असून यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत असल्यामुळे या शाळेशी संबंधित कागदपत्रे संस्थेच्या अभिलेखावर उपलब्ध असणे अपेक्षीत नाही. तसेच वरील शाळेचे प्रशासकीय नियंत्रण हे शिक्षणाधिकारी कार्यालय असल्यामुळे वरील शाळेच्या संचालनासंबंधित प्राप्त झालेल्या तक्रारी व त्यावर करण्यात आलेली कार्यवाही या संबंधित अभिलेख शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे असणे अपेक्षित आहे. वरील बाब लक्षात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र – अ च्या अनुषंगाने मुद्दा क्र.१ व २ याबाबतीतील संपूर्ण माहिती अपिलार्थीस सदर आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामुल्य प्रदान करावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी, असे आदेशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक १६.०१.२०२३ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. द्वितीय अपील क्र. ८००/२०२० मध्ये दिनांक १९.०४.२०२२ रोजी पारित आदेशानुषंगाने तक्रारकर्ता, श्री. श्रावणकर यांनी दि. २१.११.२०२३ रोजी सादर केलेल्या निवेदनात, जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, वर्ग-२ शिक्षण विभाग (माध्य), जिल्हा परिषद, भंडारा यांच्याकडून व्दितीय अपिल आदेशानुसार कलम २ च प्रमाणे देय असणारी माहिती प्राप्त झाली असल्याचे कळविले आहे. त्यामुळे तक्रारकर्ता श्री. श्रावणकर यांना सदर तक्रार पुढे चालवण्यास स्वारस्य नसल्याने प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण :** नागपूर
**दिनांक :** २२.११.२०२३

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

जा.क्र.- 2081 -दि. 4 APR 2024



E:\SS/ तक्रार २२.११.२०२३\२२-२०२३ श्रावणकर.docx